# वर्तमानकाळातील वृध्दांच्या वाढत्या समस्यांच्या कारणांचा आढावा - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**संशोधक**

**मनिषा नि अवगान**

संशोधन केंद्र - महात्मा गांधी कला, विज्ञान आणि स्व. एन. पी. महाविद्यालय, आरमोरी, जि.गडचिरोली.

Mo. No. 9158720560/9307238051

E-Mail :-manisha.awagan@gmail.com

**मार्गदर्शक**

**डॉ. ज्ञानेश्वर जी. म्हशाखेत्री**

प्राचार्य, कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय, चामोर्शी. जि. गडचिरोली.

Mo.No. 9422692233

E-Mail :- dgmgad@gmail.com

---

***सारांश :***

*मानवी जीवनचक्रातील शेवटची अवस्था म्हणजे वृध्दावस्था मानली जाते. आणि प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते. कारण वृध्दावस्था ही एक नैसर्गिक व जैविक प्रक्रिया आहे. या वृध्दावस्थेतील वृद्ध व्यक्ती हा देखील समाजाचा एक भाग आहे. आणि समाजाचा एक भाग या नात्याने तो पूर्वीपासूनच आपल्या कुटुंबातील लोकांसोबत राहतो आहे. संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात असलेल्या पारंपारिक भारतीय समाजात वृद्धांना मानाचे स्थान होते. वृद्धांचा सांभाळ केला जायचा, परंतु आधुनिक काळात विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात झाल्याचे दिसून येते. या विभक्त कुटुंबात पती-पत्नी आणि त्यांची अविवाहित मुले दिसून येते. वाढते औदयोगिकरण व नागरीकरण, व्यक्तीवादी विचारसरणी, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे वाढते प्रमाण यासारख्या कारणामुळे वृद्धांना कुटुंबात सामावून घेतले जात नाही, त्यांची योग्य काळजी घेतली जात नाही त्यामुळे वर्तमान काळात वृध्दांच्या समस्या वाढलेल्या आहेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, परावलंबन, कौटुंबिक, समायोजन अशा अनेक समस्यांचा सामना वृद्धांना करावा लागत आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वृध्दांचा समस्यांची तीव्रता लक्षात घेता वाढत्या समस्येचा कारणांचा शोध घेणे आवश्यक ठरते.*

**बीजशब्द :** वृद्ध, वृध्दावस्था, कुटुंबपद्धती, समस्या, व्यक्तीवादी विचारसरणी.

---

**प्रस्तावना:**

वृद्धावस्था ही मानवी जीवनचक्रातील शेवटची अवस्था आहे. आणि प्रत्येकच व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते. कारण वृध्दावस्था ही एक नैसर्गिक व जैविक प्रक्रिया आहे. आणि म्हणूनच जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला बाल्यावस्था, तारुण्यावस्था आणि वृद्धावस्था या तीन अवस्थांमधून जावेच लागते. या अशा वृद्धावस्थेतील प्रत्येक वृद्ध व्यक्ती हा एक सुद्धा समाजाचा एक घटक असतो आणि समाजाचा एक घटक या नात्याने तो फार पूर्वीपासूनच आपल्या कुटुंबियासोबत राहतो आहे पूर्वीच्या काळी भारतीय समाजात संयुक्त कुटुंब पद्धती होती आणि या संयुक्त कुटुंबात वृद्ध मंडळीना मानाचे स्थान होते. त्यांची कुटुंबात उत्तम देखभाल केली जायची, त्यामुळे परंपरागत भारतीय समाजात संयुक्त कुटुंबामध्ये वृद्धांना वृध्दावस्था ही समस्या कधी जाणवली नाही, परंतु

आधुनिक काळात संयुक्त कुटुंबपद्धतीचा झालेला ऱ्हास, आत्मकेंद्री प्रवृत्ती वाढते, औदयोगिकीकरण व नागरीकरण नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे वाढते प्रमाण यांसारख्या अनेक पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव इत्यादी कारणांमुळे वृध्दांना कुटुंबात सांभावून नेले जात नाही. त्यांची योग्य काळजी घेतली जात नाही.

**वृध्दावस्थेची संकल्पना :**

वृद्धावस्था ही एक शारीरिक अवस्था आहे, पंधरा-सोळा वर्षाची बाल्यावस्था संपल्यानंतर व्यक्ती जेव्हा तारूण्यअवस्थेत प्रवेश करतो, तेव्हा या अवस्थेत लग्न, पत्नी, मुले आणि संसार अशी अनेक कर्तव्ये पार पाडावी लागते. अविरतपणे काम करणाचा कोणत्याही व्यक्तीची कार्यक्षमता सारखीच राहत नसते तर ती कार्यक्षमता हळूहळू मी कमी होत जाते आणि शेवटी व्यक्ती वृद्धावस्थेला सामोरे जातो.

वृद्ध म्हणजे वाढवणे किंवा विकास पावणे होय. वाढणे याचा अर्थ ज्ञानाने आणि वयाने वाढणे होय. म्हणूनच वृद्धांना वयोवृद्ध व ज्ञानोवृद्ध म्हटले जाते. आपल्या भारत देशात 60 वर्षावरील लोकांना वृध्द समजले जाते. तर पाश्चिमात्य देशात 85 वर्षावरील लोकांना वृद्ध मानले जाते.

**वृध्दांच्या समस्या :**

वृध्दावस्था ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. या अवस्थेत वृध्दांची योग्य काळजी घेण्यात आली तर ही वृध्दावस्था त्यांच्यासाठी समस्या बनत नाही परंतु जर या अवस्थेत दुर्लक्ष केले तर वृद्धांना अनेक समस्या भेडसावत असतात.

**1) शारीरिक समस्या:**

वृद्धांचा दात पडणे,  ऐकू न येणे, हृदय, किडनी आणि पचनासंबंधीचे त्रास असणे, ब्लडप्रेशर कमी-जास्त होणे, हात-पाय दुःखणे, हाता-पायांना कंप सुटणे अशा अनेक शारीरिक समस्यांचा सामना करावा लागतो.

**2) मानसिक समस्या:**

या अवस्थेत वृद्ध चिडचिड करणे, विसराळूपणा, उत्साही नसणे, भांडखोर, संशयी वृत्ती, एकाकीपणा, हट्टीपणा अशा अनेक मानसिक समस्यांनी त्रस्त असतात.

**3) आर्थिक समस्या:**

वृद्धावस्थेत वृद्धांची कार्यक्षमता कमी झाल्याने ते कोणतेही काम करू शकत नाही. अशावेळी खर्चासाठी तसेच औषधोपरासाठी पैशाची गरज असते. तेव्हा त्यांना घरातील मंडळीकडे हात पसरावा लागतो

**४) सामाजिक समस्या:**

वृद्धावस्थेपूर्वी व्यक्तीला समाजात जो दर्जा आणि भूमिका असतो तो वृद्धावस्थेत पूर्णपणे बदललेला असतो त्यामुळे वृद्धांना समाजात असुरक्षित वाटते. आपल्याला समाजात कुणीही मान-सन्मान देत नाही, अशी न्यूनगंडाची भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते.

**५) परावलंबनाची समस्या:**

वृद्धावस्थेत वृध्दांना त्यांच्या दैनंदिन कामासाठी पूर्णपणे दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. या परावलंबनाच्या काळात वृध्दांना मदतीची गरज तसेच प्रेमाची गरज असते, परंतु व्यक्तीवादी प्रवृत्तीमुळे वृध्दांच्या समस्येत वाढ झाली आहे.

**६) कौटुंबिक समस्या :**

कुटुंबात वृद्धांच्या थकलेल्या शरीराच्या वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी कोणीही तयार नसतो. त्यांना पाणी देणे, जेवण देणे, उठायला बसायला मदत करणे गोळ्या – औषधी देणे इत्यादी कार्यात मदत करायला तयार नसते.

**७) समायोजनाची समस्या:**

वृद्धावस्थेमध्ये वृध्दांच्या शारीरिक बदलासोबतच मानसिक बदल होत असते. कुटुंबातील लोक आपल्याला विचारत नाही, आपल्याकडे दुर्लक्ष करतात, अश्या एकना अनेक भावना वृध्दांच्या मनात येत असतात. वृद्ध मंडळी आपल्या पारंपरिक विचारच कसे योग्य आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात तर तरुण मंडळी त्यांच्या अनुभवाचा मान- सन्मान ठेवत नाही. कुटुंबातील वृद्ध आणि तरुण मंडळी यांच्यात समायोजन साधले जात नाही.

**वृद्धांच्या समस्या निर्मितीची कारणे :**

**१) संयुक्त कुटुंब पद्धतीचा -हास :**

पारंपारिक भारतीय समाजात वृद्धांना मानाचे स्थान होते परंतु औदयोगिकी - करण, नागरीकरण, व्यक्तीवादी प्रवृत्ती, पाश्चिमात्य विचारसरणीचा' प्रभाव अशा अनेक कारणामुळे भारतातील संयुक्त कुटुंब पद्धतीचा -हास होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आलेली आहे. या विभक्त कुटुंबात कमावत्या लोकांनाच महत्त्व असते आणि वृध्दांची अडचण वाटू लागते.

**२) आत्मकेंद्री वृत्ती :**

पूर्वी समूहवादी विचारसरणी असल्याने कुटुंबातील वृद्ध, लहान मुले, बाळंतीण माता, अपंग अशा सर्वांनाच सोबत घेऊन चालण्याची वृत्ती होती, परंतु वर्तमान काळात स्वतः चाच विचार करू लागल्याने वृद्ध आई-वडिलांची काळजी घेणे हे खूप त्रासदायक वाटू लागले.

**३) औदयोगिकीकरण व नागरीकरण** :

औदयोगिकीकरणामुळे लहान उदयोग बंद पडले त्यामुळे पारंपारिक व्यवसायात वृद्धांच्या मार्गदर्शनाची तरुणांचा गरजच उरली नाही. तसेच लहान उदयोग बंद झाल्याने ग्रामीण लोकांना शहराकडे कामासाठी जाण्याची वेळ आली. शहारात कमी जागा, कमी उत्पन्न यांमुळे वृद्धांचा सांभाळ करणे कठीण झाले. परिणामी वृध्दांच्या समस्येत वाढ झाली.

Research Hub International Journal

**४) नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे वाढते प्रमाण :**

पारंपारिक भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री ही घरातील प्रत्येक व्यक्तीची काळजी व्यवस्थितरित्या घ्यायची परंतु सदयस्थितित नोकरी करणाचा स्त्रियांचे प्रमान वाढले आणि वृद्धांची काळजी घेण्यासाठी कुटुंबात कोणीच नसते. त्यामुळे अशा कुटुंबातील वृध्दांना त्याच्या दैनंदिन कार्यात कोणाचीही मदत मिळत नाही.

**५) आर्थिक परावलंबन :**

वृध्दावस्थेत वृद्धांना त्यांच्या औषधोपचारासाठी, त्यांच्या व्यसनासाठी एखाद्या गरजेच्या पूर्तीसाठी कुटुंबातील लोकांवर अवलंबून रहावे लागते. पैशाची गरज असते. त्यासाठी वृद्ध व्यक्तींना कुटुंबातील लोकांवर अवलंबून राहावे लागते. अशावेळी वृद्धांना कौटुंबिक कलहाचा सामना करावा लागतो.

**६) पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव :**

आधुनिक काळात औद्योगिकीकरण, नगरिकरण यासोबत पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव लोकांवर दिसून येतो. अश्या विचारसरणीमुळे आत्मकेंद्री प्रवृत्ती लोकांमुळे निर्माण झाल्यामुळे कुटुंबातील वृध्दांकडे लक्ष दयायला कोणाकडेही वेळ नाही. त्यामुळे वृध्दांच्या समस्या तीव्र होत आहे.

**७) ग्रामीण समुदायात झालेला बदल :**

पारंपारिक ग्रामीण समुदायात वृध्दांना मानाचे स्थान होते. वृध्दांना अनुभवाचा खजिना समजले जायचे. सण- समारंभ, उत्सव, लग्नकार्य याप्रसंगी त्यांच्या अनुभवाला किंमत होती. परंतु आधुनिकीकरणामुळे शहरी समजाबरोबर ग्रामीण समाजात देखील बदलाव दिसून येतो. ग्रामीण तरुणांनी देखील नवीन कल्पना, विचार स्विकारल्याने जुन्या ज्ञानाचा काहीच उपयोग राहील नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- वृध्दांच्या समस्यांचा आढावा घेणे.
- वृद्धांच्या वाढत्या समस्येची कारणे शोधून काढणे.

**संशोधनाची गृहितके :**

1. संयुक्त कुटुंबाच्या विघटनाचा परिणाम म्हणून आज विभक्त कुटुंबात वृद्धांना सामावून घेतले जात नाही.
2. व्यक्तीवादी विचारसरणीमुळे दिवसेंदिवस वृद्धांच्या समस्येत वाढ होत आहे.
3. वर्तमानकाळात वृद्धांना सर्व प्रकारची सुरक्षा प्रदान केली जात नाही.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून तथ्य संकलन करण्यासाठी ग्रंथालयातील पुस्तके, संदर्भग्रंथ, शोधनिबंध इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

Research Hub International Journal

**पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :**

**1)** प्रा. पी. के. कुलकर्णी यांनी आपल्या 'भारतातील सामाजिक समस्या' या पुस्तकामध्ये वृद्ध व्यक्तीच्या समस्यांवर चर्चा केली आहे. वृद्धांच्या समस्येचे स्वरूप दिवसेंदिवस उग्र होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

2) डॉ. ज्ञा. वि. पडोळे यांनी लिहिलेल्या आपल्या शोधनिबंधात वृद्धांच्या कुटुंबविषयक समस्यांचे अध्ययन केलेले आहे. कुटुंबात जर वृद्धांना सर्व प्रकारची सुरक्षा दिली तर वृद्धांना आनंदी जीवन जगता येईल, असे मत मांडले आहे.

**तथ्यांचे संकलन व विश्लेषण :**

वर्तमानकाळातील वृद्धांच्या वाढत्या समस्या व त्या समस्यांची कारणे यांचे अध्ययन करण्यासाठी पुर्व विदर्भातील 30 वृद्धांची गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवड करून तथ्ये संकलित करण्यात आली.प्राप्त तथ्यांचे योग्य प्रकारे विश्लेषण करून सारणीकरण करण्यात आले आणि त्यावरून निष्कर्ष काढण्यात आले.

**सारणी क्रमांक 1**

**वृद्धांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत वृद्धांची प्रतिक्रिया दर्शक सारणी**

| अ.क्र. | वृध्दांची प्रतिक्रिया | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 22 | 73.33% |
| 2 | नाही | 08 | 26.67% |
| | एकूण | 30 | 100% |

वरील सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, अध्ययनासाठी निवडलेल्या 30 वृद्धांपैकी वर्तमानकाळात वृद्धांना त्यांच्या कुटुंबात समस्या भेडसावणाऱ्या वृद्धांची संख्या अधिक म्हणजेच 22 असून त्यांचे प्रमाण 73.33% आहे. तर ज्या वृद्धांना कोणत्याच समस्या भेडसावत नाही. अशा वृद्धांची संख्या कमी म्हणजेच 8 असून त्यांचे प्रमाण 26.67% आहे.

**सारणी क्रमांक 2**

**वृद्धांना भेडसावणाऱ्या समस्या दर्शक सारणी**

| अ.क्र. | वृध्दाना भेडसावणाऱ्या समस्या | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | आर्थिक | 5 | 16.67% |
| 2 | मानसिक | 5 | 16.67% |
| 3 | शारिरिक | 3 | 10% |
| 4 | भावनिक | 7 | 23.33% |
| 5 | कौटुंबिक | 2 | 6.67% |
| 6 | कोणत्याच समस्या नाही | 8 | 26.67% |
| | एकूण | 30 | 100% |

Research Hub International Journal

वरील सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, 30 वृद्धांपैकी प्रत्येकी 5 वृद्धांना आर्थिक व मानसिक समस्यांचा सामना करावा लागत असून त्यांचे प्रत्येकी प्रमाण 16.67% आहे. तर शारीरिक समस्यांचा सामना कराव्या लागणाऱ्या वृद्धांची संख्या 3 असून त्यांचे प्रमाण 10 टक्के आहे. तर भावनिक समस्यांचा सामना कराव्या लागणाऱ्या वृद्धांचे प्रमाण 23.33% आहे.तसेच कौटुंबिक समस्यांचा सामना कराव्या लागणाऱ्या वृद्धांचे प्रमाण 6.67 आहे.त्याचप्रमाणे कोणत्याच समस्यांचा सामना कराव्या न लागणाऱ्या वृद्धांचे प्रमाण 26.67% आहे.

**सारणी क्रमांक 3**

**वृद्धांना भेडसावणाऱ्या समस्या निर्मितीचे कारणे दर्शक सारणी**

| अ.क्र. | समस्या निर्मितीची कारणे | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | मुलांची आत्मकेंद्री वृत्ती | 11 | 36.67% |
| 2 | समाजाची बदललेली परिस्थिती | 7 | 23.33% |
| 3 | संयुक्त कुटुंबपदधतीचे विघटन | 7 | 23.33% |
| 4 | आर्थिक परावलंबन | 5 | 16.67% |
| | एकूण | 30 | 100% |

वरील सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, अध्ययनासाठी निवडलेल्या 30 वृद्धांपैकी समस्या निर्मितीच्या कारणांमध्ये मुलांची आत्मकेंद्री वृत्ती असल्यामुळे 11 वृद्धांना समस्या भेडसावत असून त्यांचे शेकडा प्रमाण 36.67% आहे. समाजाची बदललेली परिस्थिती आणि संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन यामुळे समस्या भेडसावणाऱ्या वृद्धांची संख्या प्रत्येकी 7 असून त्यांचे प्रमाण 23.33% आहे. तसेच आर्थिक परावलंबन असल्यामुळे समस्या भेडसावणाऱ्या वृद्धांची संख्या 5 असून त्यांचे प्रमाण 16.67% आहे.

**निष्कर्ष :**

वर्तमानकाळात कुटुंबामध्ये वृध्दांना सामावून घेतले जात नसल्यामुळे त्यांना शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अश्या अनेक प्रकारची सुरक्षा प्रदान केली जात नाही. आपल्या आई- वडिलांना सांभाळणे ही आपले आद्यकर्तव्य आहे, असे आजच्या व्यक्तीवादी प्रवृत्तीच्या तरुण मंडळींना वाटतच नाही. औद्योगिकीकरण, आधुनिकीकरण, नौकरी करणाऱ्या स्त्रीयांचे वाढते प्रमाण, पाश्चिमात्य विचारसरणीचा प्रभाव या सारख्या कारणांमुळे वृध्दांच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आज वृध्दांना त्यांच्या आरोग्यविषयक, मानसिक, आर्थिक, कौटुंबिक समस्यांचा त्रास सहन करावा लागतो आहे.

**संदर्भ :**


- कऱ्हाडे, डॉ. बी. एम. (2010). भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, नागपूर : पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स
- आगलावे, डॉ. प्रदिप. (2003). भारतीय समाज: संरचना आणि समस्या, नागपूर: साईनाथ प्रकाशन
- कुलकर्णी, प्रा. पी. के. (१९९८) , भारतातील सामाजिक समस्या, नागपूर : विद्या प्रकाशन
- पडोळे, डॉ. ज्ञा. वि. वृध्दांच्या कुटुंबविषयक समस्या (शोधनिबंध)


Research Hub International Journal